# ॥ हरि ॐ ॥

नित्य पुजेमध्ये श्री गंगा त्रिवेणी चिन्ह देवाऱ्यांत ठेवुन अभिषेकाच्या ताम्हणाखालीही एक चिन्ह ठेवावे त्यामुळे पुजनांत कसलीही उणीव रहात नाही. तसेच त्रिवेणी संगमांत स्नान केल्याचे पुण्य प्राप्त होते व पापांचा नाश होतो. अभिषेकाचे जल तीर्थ म्हणुन प्राशन करताना ॐ गंगायै नम:, ॐ यमुनायै नम: व ॐ सरस्वत्यै नम: म्हणुन प्राशन करावे व ओला हात दोन्ही डोळ्याना, कपाळाच्या मधभागी व डोक्याच्या मागे लावावा.

- "श्री गंगा त्रिवेणी"

१
१ ३ २
२ ४ ३
३ ५ ४
४ ६ ५
५ ७ ६
६ ८ ७
७ ९ ८
८ ० ९
आवडत्या देवाचे नाव

## नित्य प्रार्थनेचा अविभाज्य भाग

आमचा बापू हळुहळु आमच्यासाठी सर्व काही नीट करीत आहे.

**I love you Bapu, How much do you love me Bapu ?.**

एक विश्वास असावा पुरता कर्ता हर्ता गुरु ऐसा.

आम्ही बापुवर प्रेम करतो , बापू आमच्यावर प्रेम करतो म्हणुन आम्ही कधीच फालतु होऊ शकत नाही आणि म्हणुनच आम्हाला कधी कसलेही प्रोब्लॅम असु शकत नाही.

हे त्रिविक्रमा मी भाग्यवान आहे कारण तु माझाच आहे, तु माझ्या जीवनांत कुठलेही उचित बदल आणु शकतोस . मी अंबज्ञ आहे.

जयंती मंगला काली भद्र काली कपालिनी, दुर्गा क्षमा शिवाधात्री स्वहा स्वधा नमोस्तुते.

## श्रीरामनवमी

गुडीपाडवा ते चैत्र पौर्णिमा ( हनुमान जयंती पर्यंत ) चैत्रोत्सवांत रोज सकाळच्या पुजेच्या वेळी व संध्याकाळी आरतीच्या वेळी श्री आदिमाता स्तवन ५ वेळा म्हणावे. रामनवमीला दुपारी रामजन्माचे वेळी रामाचा पाळणा म्हणावा.

## श्री हनुमान जयंती

हनुमंताला दुधाचा अभिषेक करावा, रुईच्या पानांचा हार घालावा व कैरिच्या पन्नाचा नैवेद्य अर्पण करावा.

॥ ॐ श्री रामदूताय हनुमंताय महाप्राणाय महाबलाय नमो नम: ॥

हा जप व संकटमोचन श्रीहनुमान स्तोत्र म्हणावे.

## नागपंचमी

वर्षातुन दोनदा भगवान शेषनागाची पुजा, नागपंचमी व अनंत चतुर्दशी ह्या दिवशी करावी. भगवान शेषनाग, भगवान विष्णुच्या सर्व अवतारामध्ये त्यांच्या बरोबर असतातच जसे रामावतारांत श्री लक्ष्मण, कृष्णावतारांत बलराम, साई अवतारांत सटका. कृष्णावतारांत रेवती बलरामाची पत्नी होती. तिने कृष्णाकडुन आपल्याला बलरामापासुन कधीही विभक्त करु नये असा वर मिळविला होता. म्हणुन शेषाची शक्ती म्हणजे उत्साह जर हवा असेल तर खालील जप वर उल्लेखलेल्या दोन्ही दिवशी जरुर करावा.

॥ ॐ रेवती बलरामाय  नमो नम: ॥

## नवरात्रीत घटस्थापना

सुर्योदयाच्यावेळी एका पाटावर तांदळानीभरलेले ताम्हण व त्यावर तांदळानी भरलेला कलश ठेवावा. त्यावर ताम्हण व भगव्या रंगाचा कपडा किंवा रुमाल ठेवुन मधोमध नंदामाईचा छोटासा फोटो ठेवावा. बाजुला ९ सुपाऱ्या वर्तुळाकार मांडाव्या. समई, उदबत्ती प्रज्वलीत करावी. दसऱ्यापर्यंत रोज अष्टगंध, हळद, कुंकु फुले, हार वहावीत व नैवेद्यासाठी रोज सकाळी दुध-साखर अर्पावी व खालील मंत्र १०८ वेळा म्हणावा.

॥ ॐ श्री आल्हादिन्यै नंदायै संधिन्यै नमो नम: ॥

जागराणाला चिदानंदा उपासना, वर दिलेला जप ( २४ ५४ १०८ ) वेळा म्हणावा. नंदामाई पाठ म्हणावा व रामरसायन संपूर्ण वाचावे व शेवटी आरती घ्यावी.

शक्य झाल्यास सोमवारी-दुध, मंगळवारी-केळी, बुधवारी-लोणी, गुरुवारी-खडीसाखर, शुक्रवारी-चणे, शनीवारी-गाईचे तुप, रवीवारी-खीर नैव्यद्य म्हणुन अर्पण करावी. घरांतल्या जेष्ट स्त्रीला आई मानुन नमस्कार करावा, ( परशुरामाची आई रेणुका मातेची आठवण म्हणुन ). नवरात्रीत एकदातरी दुर्गा महालक्ष्मीच्या धामाला भेट द्यावी. दसऱ्याला सर्व अस्त्र, शस्त्रांची पुजा करताना खालील मंत्र म्हणावा.

॥ ॐ सामर्थ्यसिंधू महाबलोत्कट श्री अनिरुद्धाय नम: ॥

शेवटी देहांतर्गत षटरिपू ( काम क्रोध, लोभ, मोह, मद, अहंकार ) यांचे सिमोल्घंन करुन आपट्याची पाने बापुना सोने म्हणुन अर्पण करावी.

## ललितापंचमी

सूर्योदयापूर्वी सद्गुरुंचा किंवा नंदामाईचा फोटो घरामध्ये सर्वत्र फिरवून त्याची स्थापना करावी. फोटो फिरविताना खालील जप करावा.

॥ ॐ श्रेष्टा स्मृतीच शुद्ध सर्व विद्या नमो नम: ॥

। शुभकार्या अधिष्टात्री सीता फलदाईनी ।

। नित्यरुपा नित्यशुद्धा इच्छा कृतीवर्धिनी

त्यानंतर प्रार्थना करावी.

हे माते तू सर्व जगताची तारिणी माता आहेस. तू इच्छापूर्तीवर्धिनी आहेस. तू थोडितरी स्मृती मला दे. ती मिळालेली स्मृती मी माझ्या जीवनात वापरेन.

शेवटी खालील जप करुन फोटोला समई, धुप, उदबत्ती, फुले, हार व पुरणचा नैवेद्य अर्पण करावा व नंदामाईची आरती करावी. साष्टांग नमस्कार घालावा.

। शरणागतदीनार्थपरित्राणपरायणे ।

। सर्वस्यार्तिहरे देवि नारायणी नमोऽस्तुते ।

। रामार्थी आदिष्टानी सीता फलदायीनी ।

। नित्य शुद्ध, शुद्ध कृती वरदाती ।

## सप्तमी श्री सरस्वती पुजन

सप्तमीला एका शिलाखंडावर किंवा पाटीवर देवमाता महासरस्वती व भक्तमाता सरस्वती यांची चित्रे काढुन त्यांचे पुजन करावे. अष्टगंध, हळद, कुंकु व अक्षता आणि फुले वहावीत व नैवेध्याला दुधसाखर अर्पण करावे.॥ॐ श्री अखिल कामेश्वरी महालक्ष्म्ये नमो नम:॥, ॥ॐ श्री कालनियंत्री महाकाल्यै नमो नम:॥ व ॥ ॐ श्री आरोग्यभवानी श्री महासरस्वत्यै नमो नम:॥

या कुन्देन्दुतुषारहारधवला या शुभ्रवस्त्रावृता
या वीणावरदण्डमण्डितकरा या श्वेतपद्मासना ।
या ब्रह्माच्युतशंकरप्रभृतिभिर्देवः सदा पूजिता
सा मां पातु सरस्वति भगवती निःशेषजाड्यापहा ॥१॥
हा जप आणि सनातनदेवी स्तोत्र म्हणावे’







## अष्टमीचा होम

सूर्यास्तानंतर जमिनीवर तांदळाचे स्वस्तिक काढावे, त्यावर ताम्हण ठेवून त्यांत ४/५ मुठी तांदुळ पसरावे आणि त्यावर कापराच्या ९ वड्या वर्तुळाकार मांडून हळुहळु अग्नी प्रज्वलीत करून खालील मंत्र २७, ५४, १०८ वेळा म्हणावे. मंत्रोत्चारावेळी एक एक कापराची वडी प्रत्येक मंत्राच्या वेळी होमात टाकावी. दुध-साखरेचा नैवेद्य अर्पण करावा. नंदामाईची आरती करावी व साष्टांग नमस्कार घालावा.

। सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके ।
। शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोऽस्तुते ।
। ॐ आदिमाता नमो नम: ।
। ॐ अनिरुद्धाय नमो नम: ।
। ॐ भगवते नमो नम: ।
। ॐ श्री आल्हादिन्यै नंदायै संधिन्यै नमो नम: ।
। ॐ नमो विश्वंभरा तुळजा भवानी श्री गुणसरिते नमो नम: ।

## कोजागिरी पौर्णिमा

कोजागिरी पौर्णिमेच्या रात्री जागरण करण्याचं महत्व आपल्याला प.पू.बापूनी सांगितलेलच आहे. ह्या रात्री लक्ष्मीमाता स्वत: पृथ्वी भ्रमण करते व जो श्रद्धावान आपल्या आदिमाता व सद्गुरुचे नामस्मरण करत जागरण करत असतो त्या प्रत्येकावर लक्ष्मीमाता कृपा करते.या वेळी चिदानंदा उपासना, नंदामाई पाठ किंवा इतर स्तोत्रे म्हणुन रात्र जागवु शकतो. तसेच या वर्षापासुन न्हाऊ तुझीया प्रेमे ची व्हिडीओ पहातपण आपण जागरण करु शकतो

## धनत्रयोदशीला श्री यंत्राचे पुजन

घरांतील नित्याची पुजा झाल्यावर श्रीयंत्राची एका आसनावर स्थापना करुन त्याला अत्तर, गंध, हाळद, कुंकु, अक्षता, व सुगंधीत फुले अर्पण करावीत. निरांजन, उदबत्ती पेटवावी. धुप जाळावा व नैवेद्याला दुध किंवा खीर अर्पण करावी आणि खालील मंत्र ( २४ ५४ १०८ ) म्हणावेत
॥ ॐ श्रीं ह्रीं क्लीं महालक्ष्म्ये नम: ॥
॥ ॐ ह्रीं सकलसर्वभुषितां ललितादेवीं नमामिं ॥
॥ ॐ ह्रीं महात्रिपुरसुन्दरी  देव्ये नमो नम: ॥
॥ ॐ श्री कमले कमलालये प्रसिद प्रसिद श्रीं ह्रीं ॐ महालक्ष्म्ये नमो नम: ॥
शेवटी दत्तमाला मंत्र म्हणुन नंदामाईची आरती करावी

## श्री लक्ष्मी पुजा

संध्यासमयी लक्ष्मीची मूर्ती किंवा फोटो एका आसनावर स्थापन करुन त्याला दुधाचा अभिषेक करावा. ( फोटोवर दुधाचा नुसता शिडकावा करावा )अभिषेक करताना खालील मंत्र ५ वेळा म्हणावा

॥ ॐ कामाक्षी एवं महालक्ष्मी: चक्रं श्री चक्रमेव: श्री विद्ये महाविद्यानायको गुरु नायका ॥

त्यानंतर पाण्याचा अभिषेक करताना खालील मंत्र ५ वेळा म्हणावा

॥ ॐ कमले कमलालये श्री ललीते महात्रिपुर सुंदरी नमो नम: ॥

त्यानंतर अत्तर मिश्रित ( सुगंधीत ) पाण्याचा अभिषेक करताना खालील मंत्र ५ वेळा म्हणावा

॥ ॐ महारातनेश्वरी वृंदमानंदिनासन सपिता सर्वजन मनोहारी श्री सिद्धलक्ष्मी नमो नम: ॥

त्यानंतर हळद, कुंकु अर्पण करताना खालील मंत्र ५ वेळा म्हणावा

॥ ॐ महाकल्पेश्वरी सर्व सौभाग्य जननी श्री महात्रिपुरसुंदरी महालक्ष्मी नमो नम: ॥

त्यानंतर देवीच्या चरणी फुले अर्पण करताना खालील मंत्र ५ वेळा म्हणावा

॥ ॐ श्रीं ह्रीं क्लीं आद्यललीते विष्णुलिलये नमाम्यहं ॥

त्यानंतर घरी शिजवलेल्या अन्नाचा नैवेद्य अर्पण करताना बरोबर गुळ आणि धणे ( सुकी कोथंबीर ) ठेवावी व खालील मंत्र ३ वेळा म्हणावा

॥ ॐ श्री माता परमेश्वरी श्री ललीता सौभाग्य पितेश्वरी नैवेद्यं समर्पयामी ॥

व नव्या केरसुणीस हळद, कुंकु व फुल घालावे.

त्यानंतर आरती करुन मूर्तीला अक्षता अर्पण करताना कुटुंबाच्या कल्याणासाठी प्रार्थना करावी. काही मनोकांक्षा असल्यास तीही व्यक्त करावी.

## दिपावली पाढवा

पाडव्याला सूर्योदया अगोदर घरातील सर्व केर कचरा एकत्र करुन जुन्या केरसुणीसकट उंबरट्या जवळ ठेवावा. केर कचरा काढताना एका थाळीवर चमच्याने वाजवत रहावे व ॥ इडा पिडा टळॊ बळीचे राज्य येवो ॥ म्हणत रहावे. केरसुणीच्या जवळ कणिकेवर तुपाचा दिवा तयार करुन ठेवावा व नैवेद्यासाठी काही गोड पदार्थ अर्पण करावा

## नव वर्षाचे स्वागत

३१ डिसेंबरच्या रात्री साधारणत: पावणे बारा वाजता सुरुवात करुन प्रथम

१)विजयमंत्र

२)घोरकष्टोद्धरण स्तोत्र

३)३ ते ५ मिनीटे (आराधना ज्योती २०) मंत्र

४)श्री आदिमाता अशुभनाशिनी स्तवनम्

५)३ ते ५ मिनीटे सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधके जप

६)३ ते ५ मिनीटे ॐ ऎंम ह्रीम क्लींम चामुण्डायै विच्चे जप

७) ३ ते ५ मिनीटे ॐ कृपासिंधु श्री साईनाथाय नम: जप

८) अक्कलकोटस्वामी स्तवन एक वेळ घ्यावे

निदान सवाबारा पर्यंत हे चालु ठेऊन प.पू. बापूना शुभेच्छा व्यक्त करुन इतर श्रद्धावानानाही शुभेच्छा द्याव्यात

## श्री गुरुपौर्णिमा

०१) प्रथम सद्गुरु चिन्मय पादुका पूजन

०२) अनिरुद्ध कवच १ वेळा

०३) सद्गुरुतारक मंत्र १०८ वेळा

०४) श्री गुरुक्षेत्रम् मंत्र २४ वेळा

०५) अनिरुद्ध चलीसा १ वेळा ( पादुका पूजनातील ५ वेळाच्या व्यतिरीक्त ) शेवटी

०६) अनिरुद्ध पाठ १ वेळा

तसेच उपासनेच्या वेळेचे भान ठेवून

०७) सद्गुरु श्री अनिरुद्ध ऋणज्ञापक स्तोत्र १ वेळा

०८) श्री अनिरुद्ध महिमा १ वेळा

०९) श्री अनिरुद्ध श्लोकी १ वेळा

१०) श्री अनिरुद्ध सहस्रनाम १ वेळा

११) श्री सद्गुरु गायत्री मंत्र (सूक्ष्म पातळी वर्चा ) २४/३६/५४/१०८ वेळा

॥ ॐ मन:प्राण:प्रज्ञा । ॐ तत् गुरुदत्तस्य उष्णं स्निग्धं गुरुर्तेजो धीमही । रामे चित्तलय: भवन्तु न: । ओज: अनिरुद्धराम: प्रचोदयात् ॐ ॥

१२) श्री सद्‌गुरु गायत्री मंत्र (स्थूल पातळी वर्चा ) २४/३६/५४/१०८ वेळा

॥ ॐ सच्चित्सुखाय विद्‌महे । नन्दापतये च धीमही । तन्नो अनिरुद्ध प्रचोदयात् ॥

१३) सत्संग

१४) आरती

## परमपूज्य नंदाईचा वाढदिवस

दीप अमावस्या प.पू. नंदामाईंचा वाढदिवस. ह्या दिवशी रात्री १० नंतर घरामध्ये एक दिवा प्रज्वलीत करा त्या दिव्याच्या ज्योतीकडे बघत आई आई आई असे ३ वेळा म्हणत हॅपी बर्थडे टु आई असे म्हणा. ही ज्योत म्हणजे आईंचे आगमन आसेल व म्हणुन ज्योत मुद्दामहुन मालवावयाची नाही.

०१) प्रथम श्री हनुमान चलीसा १ वेळा

०२) चिदानंदा उपासना १ वेळा

०३) नंदाई पाठ १ वेळा

०४) सत्संग व आरती.